# प्रकरण – दुसरे

# पर्णालपर्वतग्रहणाख्यान

# प्रकरण – दुसरे

# पर्णालपर्वतग्रहणाख्यान

## प्रस्तावना :–

विजापूरकरांची दक्षिणेकडील उपराजधानी म्हणजे 'पन्हाळगड' होय. त्याचा ताबा शिवाजी महाराजांनी इ. स. १६५९ मध्ये सर्वप्रथम मिळविला. यानंतर विजापूरकरांनी 'सिद्दी जौहर' मार्फत पन्हाळगड मिळविण्याची योजना आखली. यावेळी इंग्रजांनी मराठयांच्या विरुध्द सिद्दी जौहरला मदत करुन, मराठयांच्या विरुध्द पहिले पाऊल उचलले होते. यादृष्टीने हा संघर्ष महत्वचा होता.

इ. स. १६७३ मध्ये अदिलशाहीत निर्माण झालेल्या अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन, शिवाजी महाराजांनी पन्हाळगडाचा ताबा मिळविला. या स्वारीचे वर्णन 'जयराम पिंडये' या कवीने त्याच्या 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' या संस्कृत काव्यात केले आहे. या स्वारीचे वर्णन इतके विस्तृत स्वरुपात कुठे करण्यात आले नाही. १७ व्या शतकात पन्हाळगडाची स्थिती कशी होती. तसेच या स्वारीच्या घटनांची चर्चा या प्रकरणात करण्यात आली आहे.

## जयराम पिंडये :–

'जयराम पिंडये' हा शहाजी महाराजांच्या दरबारातील अनेक कवीपैकी प्रसिध्द असा कवी होता. जयरामने लिहिलेल्या 'राधामाधवविलासचंपू' या काव्यात त्याने स्वतःची माहिती अशी दिली आहे. काव्याच्या कर्त्याचे नाव 'जयराम' आडनाव 'पिंडये' व गोत्र 'जामदग्निवत्स'. पुढे तो वर्णीतो, सप्तशृंगीच्या समोरील मार्कंडयांच्या डोंगराखाली हया कवीचे गाव होते. पण नेमके कोणते गाव याचा उल्लेख कवीने केला नाही. कवीच्या आईचे नाव 'गंगबा' व वडीलांचे नाव 'गंभीरराव'. अहमदनगराच्या बहिरी निजामशहाच्या राज्याचे पुनरुज्जीवन शहाजी महाराज करीत असता त्यांचा गंभीररावाशी सहजच परिचय झाला होता.[१]

शहाजी महाराजांनी कर्नाटकात राज्यस्थापना केल्यानंतर[२]. जयराम शहाजी राजांची भेट घेण्यास महाराष्ट्रातून कर्नाटकात गेला. कारण, यापूर्वी शहाजी महाराजांनी अनेक कवींचा सत्कार केला होता. व काही कवींना स्वतःच्या दरबारात आश्रय दिला होता. जयराम हा ही एक कवी होता, त्याला ही महाराजांची भेट घ्यावी असे वाटणे स्वाभाविक होते. जयराम हा शहाजी महाराजांच्या राजधानीत येऊन 'शिवराय गोस्वामी' नावाच्या दरबारातील विद्वानांमार्फत राजांची भेट घेतली. त्याने बारा भाषेत काव्य रचण्याची माहिती दिली. त्या भाषा पुढीलप्रमाणे संस्कृत, प्राकृत, गोपचलिका उर्फ ग्वालेरी उर्फ व्रज, गुर्जर, वक्तर, ढुंढार, पंजाब, हिंदुस्थान, बागुल, यावनी व कर्नाटक अशा बारा भाषा सांगितल्या आहेत. यानंतर दरबारातील संस्कृत व प्राकृत कवीनी काही समस्या घातल्या. त्याचे निवारण जयरामने योग्य केल्याने, शहाजी महाराजांनी त्यास आपल्या दरबारी ठेवून घेतले.[३]

## जयराम पिंडयेची काव्ये :–

शहाजी महाराजांनी जयराम कवीला त्यांच्या पदरी ठेवून घेतले होते. यानंतर जयरामने अनेक आख्याने रचली असावीत. सध्या जयराम पिंडये याची दोनच काव्ये उपलब्ध आहेत. पण याशिवाय आणखी पाच–सहा तरी काव्ये लिहीली असावीत. त्याची उपलब्ध असणारी दोन काव्ये पुढीलप्रमाणे,

I) *'राधामाधवविलासचंपू'*

II) *'पर्णालपर्वतग्रहणाख्यान'*

### I) ***'राधामाधवविलासचंपू'*** :–

'राधामाधवविलासचंपू' हे काव्य शहाजी महाराजांच्या सांगण्यावरुन त्यांच्या मनोरंजना करीता रचले गेले. 'राधामाधवविलासचंपू' हे काव्य अकरा भागात विभागण्यात आले आहे. पहिल्या पाच भागात इतिहासभाग असेल तर तो इतकाच की, शहाजीकालीन समाजात कवित्व कशाल म्हणत. ते समजण्यास एक उत्तम साधन आहे. सहाव्या भागापासून दहाव्या भागापर्यंत शहाजी महाराजांची माहिती वर्णीली आहे. शेवटच्या अकराव्या भागात परिशिष्ट वर्णीले आहे. परिशिष्टात सर्व ग्रंथांचा एक

तृतीयांश भाग, राधाकृष्णवर्णनचा एक तृतीयांश संस्कृत भाग, शहाजी राजवर्णनाचा एक तृतीयांश संस्कृत भाग आणि एक तृतीयांश प्राकृत भाग असा एकदंर ग्रंथांचा विभाग आहे. [४]

**II) *'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' :–***

शिवाजी महाराजांनी इ. स. १६७३ मध्ये विजापूरच्या अदिलशाहीच्या ताब्यातून पन्हाळगड कसा मिळवला, याचे वर्णन जयरामने या संस्कृत काव्यात केले आहे.

***पर्णालपर्वतग्रहणाख्यान ग्रंथाची वैशिष्टये :–***

१) हा ग्रंथ संस्कृत भाषेत लिहिण्यात आला आहे.

२) हा ग्रंथ या घटनेच्या समकालीन आहे.

३) हा ग्रंथ एकूण पाच अध्ययात विभागण्यात आला आहे.

४) जयराम कवीने हे आख्यान व्यंकोजी राजांना ऐकवीले आहे.

५) पहिल्या अध्ययाच्या अखेरीस, 'इति मज्जयराम कवि विराचीते पर्णालपर्वतग्रहणाख्याने शिवराजचरित्रे प्रथमोध्याय' असे म्हटले आहे. यावरुन शिवराजचरित्रांतील अनेक आख्यानांपैकी हे एक आख्यान असावे असे वाटते.

६) जयराम ने या स्वारीच्या वर्णनाबरोबर पन्हाळगडाचे ही वर्णन या काव्यात केले आहे.

७) जयरामचे हे काव्य तंजावर येथे सरस्वती महालात मिळाले. [५]

## काव्य कधी लिहिले असावे :–

शिवाजी महाराजांनी शके १५९४ (इ. स. १६७२) मध्ये पन्हाळा घेतला. तेंव्हापासून पुढे एक महिन्यांने उम्राणीजवळ बहिलोल खानाशी प्रतापराव आणि आनंदराव यांचे युध्द झाले. या घटनेपर्यंतचे वर्णन या काव्यांत करण्यात आले आहे. अर्थात शके १५९५ (इ. स. १६७३) मध्ये हे काव्य रचले असले गेले पाहिजे. जयराम शिवाजी महाराजांच्या भेटीस गेल्यानंतर सुरतेची दुसऱ्यांदा लूट झाली. तो प्रसंग शके १५९२ (इ. स. १६७०) चा आहे. त्यानंतर तीन वर्षानी तो व्यंकोजीकडे परत येऊन सर्व

हकीकत सांगत आहे. त्या अर्थी या आख्यानकाव्याचा काळ शके १५९५ (इ. स. १६७३) हा असावा. [६]

'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' हे आख्यानकाव्य जयराम व्यंकोजीस ऐकवत होता. त्यावेळची व्यंकोजीची मनस्थिती लक्षात घेणे गरजेचे आहे. शिवाजीच्या कर्नाटक द्विग्विजयाच्या वेळी व्यंकोजी व शिवाजी यांच्यामधील सावत्रपणाचे संबंध ताणले गेले होते. त्यापूर्वी हे काव्य लिहिले गेले असले पाहिजे. [७]

## जयराम कवीची विश्वासर्हता :—

कोणत्याही ऐतिहासिक व्यक्ती संबंधाने त्याकाळातील वर्णनपर लेख अनेक प्रकारचे असू शकतात.

१) ऐतिहासिक व्यक्तीच्या ओळखीच्या मनुष्याने त्या व्यक्तीविषयी त्यांच्या संमतीशिवाय लिहिलेले लेख.

२) ऐतिहासिक व्यक्तीच्या ओळखीच्या व विश्वासाच्या मनुष्याने त्या व्यक्तीविषयी त्याच्या आज्ञेने व संमतीने लिहिलेले लेख.

३) ऐतिहासिक व्यक्तीशी प्रत्यक्ष ओळख बिलकूल नसणाऱ्या मनुष्याने अर्थात त्याच्या संमतीशिवाय लिहिलेले लेख.

वरील तीन प्रकारच्या लेखांपैकी पहिल्या प्रकारचे लेख विशेष निस्पृह निघण्याची शक्यता असते. दुसऱ्या प्रकारचे लेख हे आश्रयदात्याच्या स्तुतीवर असण्याचा शक्यता असते. व तिसऱ्या प्रकारचे लेख ऐकिव व कमी जास्त अविश्वासनीय असण्याची शक्यता असते. या दृष्टीने जयरामचा विचार करता, त्याचे काव्य हे आश्रयदात्याच्या इच्छेवर त्याचे गुणगाण करण्यास तयार होतो. असे म्हणण्याशिवाय गत्यंतर राहत नाही. जयरामच्या वर्णनात उत्प्रेक्षा, उपमा व अलंकार याने त्याचे काव्य नटले असणार. जयरामचा मुख्य दृष्टीकोन हा अलंकार करण्याकडे असून ही त्याने नायकाचे पराक्रम वर्णन केले आहे. [४]

## जयराम पिंडयेने पन्हाळगडाचे केलेले वर्णन :–

जयरामने त्याच्या या आख्यानकाव्यात या स्वारीच्या वर्णनाबरोबर पन्हाळगडाचे वर्णन केले आहे. जयराम हा एक निरस इतिहासकार नसून तो एक कवी आहे. त्यामुळे त्याच्या वर्णनात अंलकारीकता ही असणारच. पण तरीही त्याने दिलेली ही माहिती महत्वपूर्ण आहे. कारण १७ व्या शतकात पन्हाळगडाची स्थिती कशी होती हे समजण्यास हे एक चांगले प्राथमिक साधन आहे.

जयराम पन्हाळगडाचे वर्णन करताना म्हणतो, ज्याच्यावर धान्ये, वृक्ष, फुले, फळे, गाईची खिल्लारे, मीठ, तेल, गवत आहे. ज्याच्यावर सर्वत्र विहीरीच्या गोड पाण्याची कमतरता भासत नाही. जेथे मौल्यवान टोलेजंग वाडे, घोडयांच्या पागा, हत्तीखाने, लोकांची घरे यांच्या सुंदर रांगा झळकत आहेत. तेथील बाजारपेठ इतकी विस्तर्ण आहे की ती एक दुसरा समुदायच भासते. ज्याच्यावर चतुरंग सेनेसहीत शेकडो सेनापती (सरदार) ही आहेत. जेथे सर्व हिशोबनीस (चिटणीस) नागोजी पंडित (नागजित) सर्वांचे वेतन लिहित सर्वत्र फिरत असतो. ज्या गडावरील पहारेकरी शिपाई मध्यरात्रीसुध्दा जागरुक असतात, आणि मोठी घोषणा करतात. शिंगे व घंटा (तास) यांचा मधूनमधून निनाद करतो. आणि गडाच्या तटाच्या आत व बाहेर हातात शेकडो दिवटया व मशाली घेऊन चांगले उजडेपर्यंत जागत असतात. [९]

एकदंरीत संदर्भा वरुन पन्हाळगडाची भौगोलिक परिस्थिती व गडाची प्रशासन व्यवस्था कशी होती याचे वर्णन जयरामने केले आहे.

जयराम पन्हाळगडाची भौगोलिक परिस्थिती वर्णन करताना म्हणतो, जांभूळ, खजूर, फणस, आंबा, अक्रोड, नारळ, महाळूंग, कवठ, पळस, पिंपरी, बेल, पिंपळ, बोर, उबंर, चापा, बकुळ, केळी, कंचनार इत्यादी वृक्ष व मोगरा, शेवंती यांच्या वेली गडावर होत्या. तसेच गडावर 'सोमालय' नावाचे विकसित कमळांनी युक्त असे तळे असून त्याचा कांठ, सारस व हंस यांनी शोभत होता. या तलावातील पाणी गार व सुगंधी होते.[१०] या तलावाच्या बाजूला असणाऱ्या शिलालेखातील वर्णनानुसार, हा तलाव विजापूरच्या अदिलशहाच्या काळात 'मलिक इश्कंदर' याने बांधला. [११]

पन्हाळगडावर 'गंगा' व 'यमुना' या नावाचा अंबरखाना असून, तो अदिलशहाकडून शिवाजी महाराजांनी ताब्यात घेतला, तेंव्हा हा अंबरखाना धान्यांनी पूर्ण भरलेला होता. जयराम पुढे वर्णीतो, या गडाचा भाग जेथे जेथे सखल होता, तेथे चारही बाजूस गडाची तटबंदी उत्तम रितीने बांधण्यात आली होती.[१२] अदिलशहाच्या काळात या गडाच्या तटबंदीचे बांधकाम काही ठिकाणी करण्यात आले होते.

पन्हाळगडावर कोणती शस्त्रास्त्रे होती, व अन्नधान्याचे कोणते साहित्य होते. या संदर्भात जयराम वर्णीतो 'अग्नियंत्रे (तोफा), दारु इत्यादी सामग्रीचा साठा, मोठमोठे दगड, आखुड व लाबंट असे दगड, बाण, गोफणी, तलवारी, भाले, गोटे, लोखंडी गोळे, धनुष्ये इत्यादी शस्त्रांनी हा गड पूर्ण होता. तसेच गवत, सर्पण, तूप, तेल, मीठ, गुळ इत्यादी सामुग्रीने हा गड पूर्ण होता. [१३]

एकदंरीत संदर्भानुसार जयरामने त्याच्या काव्यात १७ व्या शतकात गडाची भौगोलिक परिस्थिती, गडावरच्या वास्तू, गडाची संरक्षण व्यवस्था, गडावरील अन्नधान्याचा साठा, गडावर असणारी शस्त्रास्त्रे इत्यादीचे वर्णन त्याच्या काव्यात केले आहे. काव्याचा भाग सोडता त्यांने दिलेली माहिती महत्वपूर्ण आहे.

### जयरामने इ.स. १६७३ च्या स्वारीचे केलेले वर्णन :-

पन्हाळयावरील या स्वारीचे वर्णन करण्यापूर्वी व्यंकोजीराजे आणि जयराम कवी यांच्या भेटीचे वर्णन जयरामने त्याच्या काव्यात केले आहे. जयरामकडून शिवाजी महाराजांचे चरित्र्याचा काही भाग यापूर्वी व्यंकोजीराजांनी बेगरुंळच्या गौरीविलासी नावाच्या सभेत (दिवानखान्यात) ऐकला होता. व पुढील भाग ऐकण्याची इच्छा असल्याने त्यांनी जयरामला बोलविले असावे.

जयराम सुरुवातीस व्यंकोजीना यापूर्वी आपण कोणकोणती काव्ये केली आहेत याची माहिती देतो. बारा भाषेत काव्य करु शकतो, पैकी महाराष्ट्र भाषेत, मी राजगडास घेतलेले दर्शन, शिवाजी महाराजांनी सुरत दुसऱ्यांदा लुटली त्याचे वर्णन हिंदी व महाराष्ट्रीय अशा दोन भाषेत केले आहे. त्रिंबकगड घेऊन कांरजे लुटले त्यांचे वर्णन महाराष्ट्र व हिंदूस्थानी भाषेत केले आहे. बागलाण, अहिवंत, मार्कडेय,

रवळाजवळ, चामुंडगिरी, हरिचश्चंद्र, अडसर, जीवधन, सोमशहाचे रामनगर वगैरे गड व संस्थाने महाराजांनी घेतली व त्यांची नावे बदलली. यांची वर्णने जयरामने केली होती, व ती ऐकण्याची त्यांने विनंती केली. पण व्यंकोजीस हे ऐकण्याची इच्छा असावी असे दिसत नाही, कारण त्याने जयरामकडून पन्हाळयासारखा किल्ला आमच्या राज्याच्या म्हणजे अदिलशहाच्या ताब्यातून महाराजांनी तह मोडून का व कसा घेतला असा प्रश्न केल्याचा दिसतो ? [१४]

जयरामने यानंतर दुसऱ्या अध्ययापासून शिवाजी महाराजांनी पन्हाळगडाचा ताबा कसा मिळविला, याचे वर्णन केले आहे. जयरामने पूर्वी इ. स. १६६९ ते इ. स. १६७२ या तीन वर्षात मोगल—मराठा संघर्ष कसा होता यांचे संदर्भ दिले आहेत.

मोगल—मराठा संघर्ष सुरु असतानाच इ. स. १६७३ मध्ये विजापूरचा अली अदिलशहा हा मृत्यू पावला. त्याच्यानंतर त्याचा 'सिकंदरशहा' हा चार वर्षाचा मुलगा गादीवर आला. तेंव्हा शिवाजी महाराजांचा वकील 'बाबाजी नाईक पुंडे' विजापूरच्या दरबारात होता. त्याने विजापूरच्या दरबारातील बेजबाबदार कारभाराची माहिती शिवाजी महाराजांना कळविली. त्यानुसार शिवाजी महाराजांनी पन्हाळगड घेण्याची मोहिम आखली. [१५]

'सिंकदरशहा' हा राज्यारुढ झाला, तेंव्हा विजापूरच्या राज्यात चार प्रमुख मुत्सदी होते. वजीर 'अब्दुल महमंद हबशी', सेनापती 'खवासखान', पन्हाळा भागाचा सुभेदार 'बहलोलखान', व कर्नाटकचा सुभेदार 'मुजफ्फरखान'. यापैकी 'खवासखान' याने विजापूरच्या राज्याची सत्ता आपल्या हातात घेतली.[१६] खवासखान हा मोंगलाच्या तंत्राने वागणारा असून, त्याच्या मनात मराठयांशी झालेला तह मोडून काढून युध्द सुरु करावे असे होते. पण इतर सरदारांचा यास विरोध होता. पण तरी ही खवासखानाने मराठयांशी युध्द सुरु केले. यावेळी शिवाजी महाराजांना मोगल व विजापूरकर यांच्या संयुक्त सैन्याशी एकाच वेळी संघर्ष करावा लागणार. हे पाहून विजापूरकरांशी युध्द करण्याचा निर्णय घेतला. व त्यानुसार आपल्या 'बाबाजी पुंडे' या वकीलास विजापूराहून परत बोलविले. [१७]

अशी या स्वारीची पार्श्वभूमी देऊन, जयराम तिसऱ्या अध्ययापासून पन्हाळगडचा ताबा मिळवण्याची मुख्य माहिती देण्यास सुरुवात करतो. यावेळी महाराजांना मोगल व अदिलशहा या दोघांशी एकाच वेळी संघर्ष करावयाचा होता. आणि दोघांची तयारी होण्यापूर्वी त्यांचा प्रदेश हस्तगत करावयाचा त्यांचा विचार चालल्याचे दिसते. या काळात प्रतापराव व आनंदराव हे मोगलांच्या सरहद्दीवर होते. या संधीचा फायदा घेऊन त्यांना मोगल व विजापूरकर यांच्या प्रदेशावर आक्रमणाचा हुकूम देण्यात आला. म्हणजेच ते अशा परिस्थितीत तह करण्याचा विचार करतील. यासाठी त्यांना वाईपासून लक्ष्मेश्वरापर्यंतचा व त्याच्या ही पुढील प्रदेश घेण्याचा हुकूम देण्यात आला.[१८]

जयरामने या युध्दाचे वर्णन सविस्तर मांडले आहे. या स्वारीचे वर्णन काव्यात्मक असल्याने त्याची मांडणी आंलकारिक आहे. या ठिकाणी युध्दाचे वर्णन सविस्तर न देता सारांश रुपात मांडण्याचा प्रयत्न आहे.

अदिलशहाच्या बंदोबस्तासाठी 'अनाजी पंडित' व 'कोडांजी फर्जद' यांची रवानगी करण्यात आली. याशिवाय 'गणोजी मामा' व 'मोत्याजी मामा रवळेकर' यांना वस्त्रे व भुषणे देऊन निवडक सैन्यासह कोंडाजी बरोबर रवानगी करण्यात आली. अनाजी पंडितानी राजापुरास जाऊन सर्व सामग्रीची व्यवस्था केली. तिसऱ्या दिवशी ठराविक सैन्य त्या ठिकाणाला येऊन पोहचले. त्यांनी घोरपडी, दोराच्या शिडया, मेखा, बाण वगैरे सर्व साहित्य बरोबर आणले असून, रात्री तेथून निघून ते पन्हाळयाच्या पायथ्याशी पोहचले. अनाजी पंडित आपल्या सैन्यासह किल्ल्याच्या मागील बाजूस दबा धरुन बसले होते. यानंतर जयराम पन्हाळगडाच्या उंच कडयाचे वर्णन करताना म्हणतो, 'धन्याच्या कामी साहय करणारे ते मोठया मेटाकुटीने व प्रयासाने पन्हाळगडाच्या पायथ्याशी पोचले व तुटलेल्या कडयाजवळ आले. लोकालोका पर्वताप्रमाणे उंच अशा त्या कडयाकडे वर पाहिले तेंव्हा सर्वत्र गडाची उंचीच उंची पाहून त्यांचा गर्व नाहीस झाला. नंतर काही लोकांनी एकमेकांच्या साहयाने व शिडयांचा वापर करुन गडाची माची गाठली. [१९]

मध्यरात्रीची वेळ असल्याने गडावरील अदिलशहाचे सैन्य काहीसे बेसावध होते. अशा शांत वेळी कोंडाजी आणि त्यांचे सहकारी त्यांनी मोठ–मोठयाने कर्णे वाजवयास सुरुवात केली. अशा वेळी गडावरील पहारेकऱ्यांमध्ये खूपच गोंधळ उडाला. बाहेरुन कोणी आले की गडातील काही लोक कर्णे वाजवीत आहेत याची कल्पना येईना.[२०] त्या कर्णाच्या आवाजाने दचकून उठलेला 'बाबूखान' नावाचा मुख्य अधिकारी, 'अरे हा कर्णा कोण वाजवीत आहे ?' असे ओरडू लागला. पहारेकरी झोपेतून एकदम जागे होऊन शस्त्र घेऊन धावले इतरही लोक घराबाहेर आले. हे पाहून कोंडाजीने युध्दास सुरुवात केली. किल्ल्यावरील मुख्य लेखक 'नागोजी पंडित' घराबाहेर येऊन 'हा कसला गोंधळ चालला आहे' याची चौकशी करु लागला. किल्ला शत्रूने घेतला आहे हे कळताच तो किल्ल्यावरुन निघून गेला. त्यानंतर गडावरील प्रत्येक घरावर पहारेकरी ठेवून प्रमुख अधिकाऱ्यांना पकडण्यात आले. व किल्ला ताब्यात घेण्यात आला. नंतर किल्ला घेतल्याची बातमी महाराजांना कळविण्यात आली. [२१]

विजापूरकरांची ही दक्षिणेकडील राजधानी मराठयांच्या ताब्यात परत तेरा वर्षांनी मिळाली. ही लढाई म्हणजे मराठयांच्या गनिमी काव्याचा एक प्रकारच होता.

जयरामने यानंतर चौथ्या अध्ययात शिवाजी महाराजांचे वर्णन केले आहे. दुसऱ्या दिवशी शिवाजी राजे गड पाहण्यास रायगडाहून निघाले. तेथून महाराजांनी पाचाडांस जावून अंबिकेचे दर्शन घेतले. तेथून पौलरुप नगरात (पोलादपुरांत) मंदिरात जाऊन गोस्वामीचा (स्वामी परमानंदाचा) अर्शीवाद घेतला. नंतर महाराज प्रतापगडावर गेले. तेथील भवानीची महापूजा व प्रसादानंतर निघून पन्हाळयाच्या पायथ्याशी आले. दत्तोपंत वाकेनिविसानी पन्हाळगडावर त्यांचे स्वागत केले. [२२]

जयरामने यानंतर शिवाजी महाराजांनी गडावर कोणत्या वास्तू पाहिल्या याचे वर्णन केले आहे. 'सोमलय तलाव, गंगा व यमुना ही धान्य कोठारे, पन्हाळगडाची तटबंदी इत्यादी वास्तू महाराजांना दाखविण्यात आल्या. यानंतर शिवाजी महाराजांनी या वक्र (वाकडया) गडावर एक महिना मुक्काम केला.

जयरामने यापुढील घटना या पाचव्या अध्ययात वर्णीलेल्या आहेत. विजापूरकरांना या घटना जेंव्हा कळाल्या, तेंव्हा खवासखानकडून सेनापती पद काढून

घेऊन ते 'बहलोलखानास' देण्यात आले. यानंतर बहलोलखान विजापुराहून सैन्यासह तिकोटयास आला. तेथून दोन दिवसांनी तो उम्रणीस आला. तेंव्हा विजापूराहून त्याला पत्र आले त्यातील वर्णनानुसार, सजीखानासमवेत मुजाफर मलिक हा सैन्यासह रांगणे किल्याच्या आसपास आहे. त्या अत्यंत बलाढय सरदारास साहयासाठी वश करुन घ्यावा, त्याचप्रमाणे अदवनीमध्ये स्थापिलेला सिद्दी मसूद, कर्नालचा अबदुल अजीज, नलदुर्गाच्या पायथ्याच्या अलिकडचा सिदरखान ज्याला 'पणि' असे म्हणतात. असे तिघे सेनापती आहेत. दुसरेही अवसनदार सैन्य मदतीस मिळवण्यासाठी जणू काय विकत घेण्यासाठी, हया तिघा सेनापतीनी दिलेरखानास लवकर भेटून लाचलूचपत देऊन सैन्य मागावे, त्या सैन्यासह आपले स्वतःचे सैन्य घेऊन तुम्ही सर्वांनी बहलोलखानाच्या मदतीस जावे. म्हणून मुद्दाम हयाच कामासाठी हया हेरास पाठविले आहे. तेंव्हा तुम्ही सर्वांनी मिळून आमचा शत्रू जो शहाजी राजाचा पुत्र शिवाजी त्याला युक्तीने जिंकावे.'[२३]

शिवाजी महाराजांनी ही इकडे शत्रूशी लढण्याची तयारी चालविली होती. त्यांनी आपले सेनापती 'प्रतापराव' व 'आनंदराव' यांना बोलवून त्यांच्याशी विचारविनियम करुन शत्रू जवळ आहे तो पर्यंत त्याला पकडावा म्हणजे आपले काही नुकसान होणार नाही असा विचार ठरला. या युध्दात ही गनिमी काव्याचाच प्रकार वापरल्याचे दिसते. यानंतर आनंदराव व प्रतापराव हे सैन्यासह शत्रूचा जलाशय (तलाव) जेथे होता तेथे पोहचले. या ठिकाणच्या प्रदेशाची पाहणी करुन या ठिकाणी आपल्या सैन्याची मोर्चे बांधणी करण्यात आली. यात 'सिद्दी हिलालखान' आघाडीस होता. त्याच्यामागे काही अंतरावर 'विठोजी शिंदे' त्याच्या बाजूस 'कृष्णाजी भास्कर' व 'विठ्ठल पीलदेव' यांची नेमणूक करण्यात आली. 'विसोजी बल्लाळ' यांची चौफेर पाहणी करण्यास नेमणूक करण्यात आली. अशा स्वरुपाची सैन्याची विभागणी होईपर्यंत शत्रूला त्याचा अंदाज ही आला नाही. या सुमारास शत्रू पक्ष हत्तींचा तांडा घेऊन तलावाच्या ठिकाणी आले असता प्रतापरावाच्या सैन्याने त्यास घेरले. त्यामुळे बहलोल खानाच्या सैन्यात मोठी धांदल उडाली. दोन्ही सैन्यात संघर्षाची सुरुवात झाली, यात आनंदरावाने पराक्रम गाजविला. या संघर्षात शत्रू पक्षातील हत्ती सुटला. व त्याने आपल्याच पक्षातील काही

सैन्याला ठार मारले. रुपाजी भोसला, सामजी (सोमाजी) मोहिता, सिदोजी निंबाळकर, विठोजी शिंदे, विठ्ठल पीलदेव हे मोठया सैन्यासह शत्रूवर चालून गेले. अशा प्रकारे युध्दाची मोठी रणधुमाळी माजली. यानंतर बहलोलखानाच्या बरोबर आलेला 'सिद्दी महमद बर्की' हा बाहेर पडला. त्याच्यावर 'दिपाजी राऊतराव' याने हल्ला केला. या दोघांच्या संघर्षात बर्की हा मारला गेला. बर्की मेल्याची बातमी कळताच बहलोलखानाचा धीर तुटला, कारण बर्की हा बहलोलखानाचा आप्त सोबती होता. यानंतर बहलोलखानात संघर्ष सुरु ठेवण्याची हिंमत राहिली नसल्याने, प्रतापरावाने दाखविलेल्या मार्गाने निघून गेला. नंतर 'कृष्णाजी भास्करने' बहलोलखानाचे हत्ती, घोडे व रथ हे ताब्यात घेतले. [२४]

एकदंरीत जयरामने या युध्दाचे वर्णन सविस्तर दिले आहे. युध्दाच्या लहान—लहान घटना यात आल्याने हे वर्णन विस्तारले आहे.

'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' या आख्यानकाव्यात जयरामने एकदंरीत पाच अध्याय दिले आहेत. यापैकी पहिल्या अध्ययात व्यंकोजीराजे आणि जयराम कवी यांची भेट कशी घडून आली. व्यंकोजीने जयरामची यापूर्वी काही काव्ये बेगरुंळच्या 'गौरीविलासी' नावाच्या सभेत ऐकली होती. जयरामने यापूर्वी शिवाजी महाराजांच्या स्वारीची कोणकोणती काव्ये केली आहेत. यांचे संदर्भ दिले आहेत. पण व्यंकोजीने यावेळी पन्हाळगडाच्या स्वारीचेच वर्णन ऐकण्याची इच्छा व्यक्त केली असे दिसते.

जयरामने दुसऱ्या अध्ययात मोगल—मराठा संघर्ष यांचे विवेचन केले आहे. या संघर्षाची सुरुवात सालेरीच्या संघर्षापासून दिली आहे. या अध्ययात छ. शिवाजींच्या सैन्याचा पराक्रम, गनिमी काव्याचा प्रकार, डोंगररांगाचा प्रदेश इत्यादी गोष्टी मोगल सैन्याला कशा त्रासदायक ठरत होत्या याचे वर्णन जयरामने दिले आहे.

जयरामने तिसऱ्या अध्ययात विजापूरच्या अली अदिलशहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा अली अदिलशहा राज्यारुढ झाला पण खरी सत्ता 'खवासखान' नावाच्या वजीराने आपल्या हाती घेतली. व मराठयांच्या प्रदेशाला उपद्रव देण्यास सुरुवात केली. त्यामुळे शिवाजी महाराजांनी पन्हाळगडाची मोहिम हाती घेतली व यासाठी 'अनाजी

पंडित' व 'कोंडाजी फर्जद' याची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी 'पन्हाळगड' कसा मिळविला याचे वर्णन जयरामने काव्यरुपाने विस्तारीत स्वरुपात मांडले आहे.

जयरामने चौथ्या अध्ययात शिवाजी महाराजांच्या वर्णना बरोबरच, पन्हाळगडावर असणाऱ्या वेगवेगळया वास्तू यांची वर्णने देण्यात आली आहेत. यात सोमालय तलाव, गंगा व यमुना ही धान्य कोठारे, गडाची तटबंदी इत्यादीचे संदर्भ दिले आहेत. तसेच हा गड संरक्षणदृष्टीने किती अभेद होता, हा गड शत्रू पक्षाला जिंकणे किती अवघड होते याचे वर्णन केले आहे.

जयरामने पाचव्या अध्ययात मराठयांकडून खवासखानाचा पराभव झाल्याने त्याने स्वतःचे धोरण बदलून सर्व राज्य कारभार 'बहलोलखाना'कडे सुपूर्द केला. बहलोलखानाने सर्व सैन्य एकवटून शिवाजी महाराजांच्या प्रदेशावर आक्रमणाची तयारी चालविली. अशा काळात प्रतापराव व आनंदराव यांनी शत्रूच्या सैन्यावर अचानक आक्रमण केले. या संघर्षाचे ही विवेचन जयरामने अतिशय विस्तारीत स्वरुपात केले.

जयरामच्या या आख्यानकाव्यात त्याची काही वर्णने ही काल्पनिक स्वरुपात मांडली आहेत. प्रत्येक घटना ही काव्यात्मक शैलीत सजवून मांडली आहे. पण शेवटी हा एक कवी आहे ही बाब लक्षात ठेवावी लागते. त्यामुळे त्याच्या या आख्यान काव्याला काव्यबध्द इतिहास म्हणणे जास्त योग्य होईल.

वरील सारांशवरुन प्रस्तूत आख्यानकाव्याची कल्पना करता येऊ शकते. केवळ ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीने हे तात्पर्य काढले आहे.

जेधे शकावलीतील नोंदीवरुन शिवाजी महाराजांनी पन्हाळगडाचा ताबा कधी मिळवला असावा याचा अंदाज येतो. जेधे शकावलीतील नोंदी अशा, 'शके १५९४ परिधावी संवत्सरेः मार्गशीर्ष मासी (नोव्हेंबर–डिसेंबर १६७२) अली अदिलशहा परलोकास गेले त्याचा पुत्र सुलतान सिकंदर तक्ती बसविला. खवासखान कारभारी जाहला. राजश्रीयाचा व अदिलशाहीचा सल्ला तुटला. बाबाजी नाईक पुंडे विजापूरी वकील होते. त्यास बोलावून आणले. फाल्गुन वद्य १३ (६ मार्च १६७३) पनालगड आणाजी पंतीभेद करुन कोंडाजी फर्जद बराबर देऊन घेतला, पाठी लोक रवाना केले

त्यांनी पनाला घेतला. [२५] तसेच सरदेसाईनी 'मराठी रियासतीत' पन्हाळगड घेण्याची तारीख ६ मार्च १६७३ अशी दिली आहे.

एकदंरीत संदर्भावरुन मराठयांच्या ताब्यात पन्हाळगड ६ मार्च १६७३ रोजी आला असावा.

जेधे शकावलीत, 'शके १५९५ प्रमादी संवत्सर : चैत्र शुध्द प्रतिपदा (९ मार्च १९७३) राजश्री रायरीहून पनाल्यास गेले. तेच मासी (६ मार्च १६७३) बहलोलखान यासी व प्रतापराव व आनंदराव यासी लढाई जाहली. विजापूराजवळ फत्ते जाहली. येक हत्ती पाडाव जाला. अशी चार वाक्ये आहेत. पण ऐवढयाने या स्वारीचे समग्र स्वरुप लक्षात येत नव्हते. पण 'जयराम पिंडये' च्या 'पर्णालपर्वतग्रहख्यान' या ग्रंथावरुन या पूर्ण स्वारीचे स्वरुप सहजपणे लक्षात येऊ शकते.[२६]

## समारोप :–

इ. स. १६६० मध्ये 'सिद्दी जौहर' याने शिवाजी राजाकडून पन्हाळा ताब्यात घेतला. पण पुढे इ. स. १६७३ मध्ये छ. शिवाजी राजांनी हा गड प्रतापराव व आनंदराव या दोन सरदारामार्फत विजापूरच्या अदिलशहाकडून परत मिळवला. या प्रस्तूत स्वारीचे समग्र वर्णन 'जयराम पिंडये' या कवीने त्याच्या 'पर्णालपर्वतग्रहणाख्यान' या ग्रंथात केले आहे.

'जयराम पिंडये' हा शहाजी महाराजांच्या दरबारातील अनेक कवीपैकी प्रसिध्द असा कवी होता. त्याने अनेक आख्यान काव्ये शहाजी, शिवाजी व व्यंकोजी यांना ऐकवली होती . त्याला बारा भाषा अवगत होत्या असे मानले जाते. शिवाजीने पन्हाळगड कसा हस्तगत केला हे व्यंकोजीला जयराम कवीने ऐकवलेले आख्यानकाव्य आहे. या आख्यानकाव्यात इ. स. १६७३ च्या स्वारीच्या वर्णना बरोबरच पन्हाळगडाची भौगोलिक परिस्थिती, पन्हाळगडावरील वास्तू, पन्हाळगडाची प्रशासन व्यवस्था इत्यादीचे वर्णन जयरामने या आख्यानात केले आहे. त्याच्या आख्यानात अंलकारीक शब्दप्रयोग, उपमा, उत्प्रेक्षा यांनी त्याची वाणी नटली आहे. पण तरीही हे आख्यानकाव्य समकालीन असल्याने हे एक महत्वाचे प्राथमिक साधन आहे.


15131

## संदर्भग्रंथ सूची :–


१) राजवाडे वि. का, ( संपा. ) – राधामाधवविलासचंपू, पृ. ४.

२) कित्ता – पृ. ४.

३) कित्ता – पृ. ५ – ८.

४) कित्ता – पृ. ६ – ७.

५) दिवेकर स. म, ( संपा. ) – पर्णालपर्वतग्रहणाख्यान, पृ. १ – ३.

६) कित्ता – पृ. १.

७) कित्ता – पृ. १.

८) राजवाडे वि. का. – उपरोक्त, पृ. ५ – ८.

९) दिवेकर स. म. – उपरोक्त, पृ. ५ – ७.

१०) कित्ता – पृ. २९ – ३३.

११) गॅझेटियर ऑफ द बॉम्बे प्रेसिडंन्सी, कोल्हापूर, पृ. ४२२.

१२) दिवेकर स. मा. – उपरोक्त, पृ. ३३ – ३४.

१३) कित्ता – पृ. ३४.

१४) कित्ता – पृ. ५ – ७.

१५) गर्गे स. मा. – करवीर रियासत, पृ. २१.

१६) सरदेसाई गो. स. – मराठी रियासत, खंड १, पृ. २८४.

१७) दिवेकर स. मा. – पृ. १७ – १८.

१८) कित्ता – पृ. १८.

१९) कित्ता – पृ. १८ – २१.

२०) गर्गे स. मा. – उपरोक्त, पृ. २१ – २२.

२१) दिवेकर स. मा. – पृ. २१ – २४.

२२) बेंद्रे वा. सी. – श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचिकित्सक चरित्र, पृ. ७०२.

२३) कित्ता – पृ. ७०२.

२४) दिवेकर स. मा. – उपरोक्त, पृ. ४२ – ४९.

२५) सरदेसाई गो. स. – उपरोक्त, पृ. २८४.

२६) दिवेकर स. मा. – उपरोक्त, पृ. ७.